
सिंहासन बत्तिशी
सरोज चौगुले
परी प्रकाशन

सिंहासन बत्तिशी

◆ ————————

© सुरक्षित

◆ ————————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ————————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ————————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ————————


**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ————————

**किंमत :**
रुपये १२०/-

# अनुक्रमणिका


१. पूर्ववृत्त– सिंहासन कोणाचे ? ........ ५
२. परम उदार विक्रम ........ १२
३. नीतीकथेचा कदरदान विक्रम ........ १७
४. उचित न्यायदाता विक्रम ........ २५
५. सुवर्ण कुंडले देणारा विक्रम ........ ३१
६. श्रद्धावान विक्रम ........ ३६
७. राजकन्या शापमुक्त केली ........ ३८
८. सेवाधर्मी विक्रम ........ ४४
९. स्वार्थत्यागी विक्रम ........ ४८
१०. प्राणदानी विक्रम ........ ५३
११. समदृष्टी विक्रम ........ ५८
१२. महान विक्रम ........ ६२
१३. परोपकारी विक्रम ........ ६५
१४. रक्तबीजाचा विनाशक विक्रम ........ ७१
१५. दयाळू विक्रम ........ ७७
१६. पवनदेव व समुद्रदेवाचे वरदान ........ ८२
१७. न्यायी विक्रम ........ ८८
१८. परहित तत्पर विक्रम ........ ९१
१९. प्रत्यक्ष प्रमाणदर्शी विक्रम ........ ९४
२०. प्राणदाता विक्रम ........ १००
२१. प्रगाढ ज्ञानी विक्रम ........ १०५
२२. उग्र तपस्वी विक्रम ........ ११०
२३. मन रथ, ज्ञानसारथी मानणारा विक्रम ........ ११५
२४. प्रजाहितदक्ष विक्रम ........ ११९
२५. चारित्र्यवान गुणग्राही विक्रम ........ १२२
२६. इंद्रसन्मानित विक्रम ........ १२५
२७. श्रद्धाप्रिय विक्रम ........ १२८
२८. शिवभक्त विक्रम ........ १३२
२९. कलागुणांचा कौतुककर्ता विक्रम ........ १३५
३०. बुद्धी संचितानुसारी मानणारा विक्रम ........ १३९
३१. कालमहिमा जाणणारा विक्रम ........ १४२
३२. सिंहासनाचा शेवट ........ १४८



# पूर्ववृत्त - सिंहासन कोणाचे ?

मुलांनो, गोष्टी ऐकायला आवडतात ना तुम्हाला ? आपल्या देशातल्या न्यायप्रिय राजाच्या धैर्य, शौर्य, औदार्य गुणांच्या कथा नक्की आवडतील तुम्हाला. सिंहासनावर जडवलेल्या बत्तीस रत्नपुतळ्यांनी सांगितलेल्या या कथा म्हणून त्यांना 'सिंहासन बत्तिशी' कथा म्हणतात. 'क्षेमेंद्र' नावाच्या मुनीने संस्कृतमध्ये या कथा रचल्या. त्या 'सिंहासन द्वात्रिंशिका' नावाने प्रसिद्ध झाल्या. नंतर 'बररूची' कवीने बंगाली भाषेत भाषांतर केले आणि मग देशभर अनेक भाषांमध्ये त्यांचे रूपांतर होत गेले. मराठीत 'सिंहासन बत्तिशी' नाव प्रसिद्ध झाले. ऐकणाऱ्यांना गुंतवून ठेवू लागले; पण मध्ये मध्ये संस्कृत श्लोक असल्यामुळे वाचणे थोडे कठीण होऊ लागले. म्हणून संस्कृत श्लोकांचा अर्थ, आशय कायम ठेवून साध्या सोप्या मराठी भाषेत हे रूपांतर केले.

आता आपण हे सिंहासन कोणाचे ? कुणाला मिळाले ? कुठे मिळाले ? निर्जीव पुतळ्या कशा बोलू लागल्या ? का बोलू लागल्या? काय सांगू लागल्या ते समजून घेऊया.

फार फार पूर्वी 'धारा' नगरीमध्ये 'भोज' नावाचा राजा राज्य करत होता. तो अत्यंत शूर, उदार, पराक्रमी होता. एकदा दरबारी लोकांनी त्याला 'एक गुराख्याचा मुलगा काटेकोर न्याय देतो. बरेच लोकांना कठीण प्रश्नांची योग्य उत्तरे देऊन संतुष्ट करतो' असे सांगितले.

त्याला मोठे आश्चर्य वाटले.'दहा बारा वर्षांचा अडाणी मुलगा न्याय कसा देतो ? न्यायबुद्धीचे तर्कशुद्ध धडे कोठून घेतो ?' प्रत्यक्ष जाऊन पाहावे असे राजाने ठरवले. वेश पालटून राजा व प्रधान गेले. अवंती नगराजवळ एक छोटीशी टेकडी होती. गुराखी मुलं गुरं चारायला घेऊन आली होती. त्यातला एक चुणचुणीत मुलगा टेकडीच्या माथ्यावर बसला होता. आजूबाजूच्या खेडुतांच्या समस्यांचा अगदी योग्य निवाडा करत होता. राजा थक्क झाला. त्याने गुराख्याला प्रश्न विचारला,

''तू इतका चांगला न्याय कसा देऊ शकतोस ? कुणाचे मार्गदर्शन घेतोस ?''

''छे ! छे ! आम्ही अडाणी गुराखी लोक, आम्हाला मार्गदर्शन कोण देणार ? पण मी त्या टेकडीवर चढलो की होतो मोठा चमत्कार! आपोआपच मला प्रश्नांची उत्तरे सुचतात. ती ऐकून लोक संतुष्ट होतात. टेकडीवरून खाली उतरलो की मी साधा गुराखी असतो. सवंगड्यांचा खेळगडी होऊन खेळतो.''

राजाने त्याला शाबासकी दिली. कठीण सवाल विचारून परीक्षा घेतली. सर्वांना सुवर्णमुद्रा देऊन खूश केले. राजा व प्रधान राजधानीत परत आले; पण राजाचे मन बेचैन झाले.हा गुण त्या भूमीचा असावा किंवा तिथे एखादी वस्तू गाडली असावी हे राजाने मनाशी पक्के केले. अवंती राजाकडून भरपूर धन देऊन ते क्षेत्र विकत घेतले. टेकाडावर उभे राहताच त्याला राज्यातल्या सगळ्या जनतेचं दारिद्र्य दूर करावं अशी तीव्र इच्छा झाली. खाली उतरताच ती इच्छा गायब झाली. तेव्हा राजानं ती जागा खणून पाहायचं ठरवलं आणि काय आश्चर्य जमीन खणताच चंद्रकांत मण्यांचं दिव्य सिंहासन दिसलं. त्या सिंहासनाला अप्रतिम सुंदर बत्तीस रत्नजडित पुतळ्या जडवलेल्या दिसल्या. राजाला सिंहासन खूप आवडले. त्याने ते प्रयत्नपूर्वक धारानगरीत आणले. धूळ माती झटकून धुऊन पुसून स्वच्छ केले. तसे ते सिंहासन नजर ठरणार नाही इतके झळाळू लागले. हिरे, रत्नं, माणकं जडवलेलं ते सोन्याचं

सिंहासन भोज राजाला भुरळ पाडू लागले. राजाने सिंहासन राजसभेत आणून ठेवले. सर्व तीर्थामधले पवित्र उदक, एकशे आठ प्रकारची औषधी, छत्र, चामर, खड्ग इत्यादी राज्याभिषेक साहित्य सिद्ध केले. त्या अनुपम सुंदर, मनमोहक, अनमोल सिंहासनावर बसण्यासाठी त्याचे मन आतुर झाले !

सिंहासनाच्या पहिल्या पायरीवर भोज राजाने पाय ठेवला. इतक्यात मोठाच चमत्कार झाला. बऱ्याच बायकांच्या खळखळून हसण्याचा आवाज आला. भोजराजा चमकून तिथेच थबकला. सिंहासनाला जडवलेल्या बत्तीस रत्नजडित पुतळ्या जिवंत झाल्या होत्या. त्या भोजराजाला हसत होत्या. त्या म्हणाल्या, ''हे भोजराजा, ज्याचे औदार्य अलौकिक असेल, त्यालाच या सिंहासनावर बसण्याचा अधिकार आहे. इतरांना नाही.'' इतके बोलून स्तब्ध झाल्या.



''का ? का नाही ? मी याचकांना लक्षावधी मोहरा दान करतो.

अर्थातच मीच एकमेव उदार, दानशूर आहे ! माझ्याशिवाय दुसरा आणखी कोण उदार आणि दानशूर आहे ?'' आश्चर्यचकित भोजराजाने विचारले.

ते ऐकून पहिली पुतळी रत्नमंजिरी म्हणाली, ''हे राजा, इतकी आत्मप्रौढी योग्य नव्हे !

'परका गुणगौरव करी ज्याचे, तो अल्पगुणीही थोरवी पावतो ।

थोर इंद्रही स्वमुखे स्वगुणथोरवी वर्णिता, क्षुद्र पाहा ठरतो ।।' त्या पुतळीचे बोलणे ऐकून भोजराजा खजिल झाला.

निर्जीव रत्नपुतळी बोलताना पाहून चकित होऊन त्याने विचारले, '' हे रत्नपुतळी, हे सिंहासन कोणाचे ? या दिव्य सिंहासनावर बसणाऱ्याचे औदार्य मला सांगशील का ?''

''हे राजा, हे सिंहासन राजा विक्रमाचे आहे. स्वत: इंद्राने त्याला त्याचा उदारपणा, शूरता, धैर्य, न्यायीपणा, विद्वत्ता, गुणग्राहकता, परोपकारिता, प्रजाहितदक्षता अशा अनेकविध गुणांवर प्रसन्न होऊन भेट म्हणून दिले आहे. तेव्हा या स्वर्गीय सिंहासनावर त्याच्या तोडीचाच गुणवान, उदार मनुष्य हवा.'' रत्नमंजिरीने सांगितले.

''हे रत्नमंजिरी, असा दैवी गुणसंपन्न विक्रम राजा कोण होता ? त्याचा परिचय सांगशील ?'' भोजराजाने उत्सुकतेने विचारले.

''हे राजा, पूर्वी गंधर्वसेन म्हणून राजा होता. त्याचा पुत्र होता विक्रम. गंधर्वसेनाला ब्रह्मवित्, शंख, भर्तृहरी, विक्रम, चंद्र, धन्वंतरी अशी मुले होती. भावा-भावांमध्ये भांडणे नकोत म्हणून राजाने सर्वांना गुणानुसार पदे दिली होती. ब्रह्मवित्‌ला दिवाणपद दिले; पण जबाबदारी न पेलल्याने तो पळून गेला. भर्तृहरी उज्जयनीचे राज्य सांभाळत होता. त्यानंतर मधली भावंडं सोडून राजा विक्रमाला आपल्या अम्बावती राज्याच्या उत्तराधिकारी करील अशा संशयाने शंखाने गंधर्वसेनाचा म्हणजेच पित्याचा वध करून स्वत:ला राजा घोषित

केले. तो भयंकर प्रकार पाहून राजवैभवाची शिसारी येऊन विक्रम वनात तपश्चर्या करायला निघून गेला. बाकीचे भाऊ पळून गेले; पण शंखाने सर्वांना शोधून काढून ठार मारले. फक्त विक्रम सापडला नाही !

बऱ्याच प्रयत्नानंतर विक्रम तपश्चर्या करतो हे कळले. एका तांत्रिकाला सामील करवून घेऊन शंखाने विक्रमाला मारायचा कट रचला. तांत्रिकाने विक्रमाचा विश्वास संपादन केला. काली मंदिरात देवीपुढे मस्तक झुकवायला सांगितले. चतुर विक्रमाने कावा ओळखून 'कसे मस्तक झुकवायचे ते तू दाखव' म्हटले. तांत्रिकाने मस्तक झुकवले. गाभाऱ्याबाहेर लपलेला शंख घाईने आत आला. तांत्रिकाच्या मानेवरच विक्रम समजून घाव घातला. तलवारीच्या एका घावात तांत्रिकाचे मुंडके तुटले. विक्रम सुरक्षित दिसला. शंखाने त्याच्यावर हल्ला केला. विक्रमाने चपळाईने घाव चुकवला. त्याचीच तलवार हिसकून घेऊन शंखाला ठार केले. राज्याचा लोभ न धरता अरण्यात निघून गेला. तेथे त्याला तूतवर्ण बाहूबल राजाचा महाल दिसला. विक्रम त्याचा दिवाण बनून राहिला; पण तूतवर्णाला विक्रमामध्ये चक्रवर्ती राजाची लक्षणे दिसली. त्याने आनंदाने विक्रमाचा राज्याभिषेक केला आणि सुवर्णसिंहासन दिले. विक्रम न्यायाने राज्य करू लागला.

इकडे उज्जयनीमध्ये भर्तृहरी राज्य करत होता. त्याच्या राज्यातला एक ब्राह्मण तपश्चर्या करत होता. त्याच्या तपाने प्रसन्न झाली देवता. एक फळ देत म्हणाली, 'हे अमरफळ घेऊन जा. फळ खाऊन अजरामर होऊन जा.' ब्राह्मण घरी आला. विचार करू लागला. 'मी दरिद्री अमर होऊन काय करणार ? त्यापेक्षा हे फळ राजाला द्यावे. राजा अमर होऊन पृथ्वीपालन करील, ते पुण्य पदरी घ्यावे.' असा विचार करून तो राजा भर्तृहरीकडे आला. राजाला फळ देऊन सगळा वृत्तांत सांगितला. तो वृत्तांत ऐकून राजाने ब्राह्मणाला भरपूर धन दिले आणि ते

फळ घेतले. आपल्या प्राणप्रिय राणीला दिले. तिने ते तिच्या प्रियकराला दिले. त्या प्रियकराने त्याच्या आवडत्या गणिकेला दिले. त्या गणिकेचा जीव भोजराजावर जडला होता म्हणून तिने ते भोजराजाला दिले. अशा प्रकारे ते फळ फिरून भोजराजाकडे आले. तेव्हा 'असे का घडले?' म्हणून राजाने चौकशी केली असता सर्व हकीकत त्याला कळली. दैवाचा हा दुर्विलास बघून राजाला पश्चात्ताप झाला आणि त्याने सर्वांचाच धिक्कार केला व म्हणाला,

चिंतन करतो सदैव जिचे, ती राणी नसे मजवर अनुरक्त ।
प्रिय असे तिज दुसरा कोणी, तो होई दुज्या गणिकेवर आसक्त।।
ती कोणी गणिका मजवर करून प्रीती, होई मनात संतुष्ट ।
धिक्कार असो, तिचा, त्याचा, हिचा, माझा, मदनाचा, जो निर्मी प्रेम विकृत ।।

सर्वांची निंदा करून भर्तृहरीने ते फळ स्वत:च खाल्ले आणि राज्य सोडून तो वनात गेला. पुढे त्याने 'नीतीशतक', 'शृंगारशतक' 'वैराग्य शतक' अशी काव्ये लिहिली. त्या काव्यांच्या रूपाने तो अजरामर झाला !

इकडे भर्तृहरीच्या रिकाम्या सिंहासनावर ज्याला बसवावे त्याला वेताळ मारत असे. हे विक्रमला कळले. तेव्हा सामान्य माणसाचा वेश घेऊन तो उज्जयनीला आला. त्याने प्रधानाला 'येथे कोणी राजा का नाही' विचारले. त्याने वेताळाचे वर्तमान सांगितले.

ते ऐकून विक्रम म्हणला, ''मला राज्यावर बसवले तर मी हे राज्य चालवीन.''

हा कोणी धैर्यवान असावा म्हणूनच तयार झाला. असा विचार करून त्याला प्रधानांने राज्याभिषेक केला. विक्रमाने दिवसभर राजकाज केले. रात्री नाना प्रकारचे अन्न शिजवून पलंगाजवळ ठेवले. वेताळाची वाट बघत राहिला.

वेताळ आल्यावर म्हणाला, ''वेताळा, आधी हे अन्न खा. मग मला खा !'' वेताळाने आनंदाने सगळे अन्न खाल्ले, तृप्त होऊन विक्रमाला न मारता गेला. असे काही दिवस गेले.